## जाहीर प्रसिध्दीकरण

याद्वारे तमाम जनतेला कळविणेत येते की, राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक कार्यक्षम व समायोजित लोकसेवा देण्याकरीता तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेवून त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश 2015 दि.28/4/2015 रोजी लागू करण्यात आला आहे. सदर अध्यादेश निर्गमित करण्यामागे सार्वजनिक प्राधिकरणाने पूर्वी असलेल्या सेवा या अधिनियमांतर्गत अधिसूचित करुन त्याप्रमाणे संबंधित सेवा पुरविणे आवश्यक आहे. त्यामध्ये नगरपरिषद या नागरी स्थानिक संस्थांचा भाग आहे. नागरी संस्थांगार्फत देण्यात देणा-या विविध सेवा सुविधांपैकी नागरिक केंद्रयिदू माणून, नागरिकांना दैनंदिन जीवनामध्ये सातत्याने आवश्यक असणा-या व ज्या लोकसेवांचा जास्तीत जास्त फायदा घेतलेला आहे व ज्या सेवा महत्वाच्या आहेत, अशा सेवा अध्यादेशाच्या कलम 3 (अ) नुसार अधिसूचित करण्यावायत महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एमसीओ 2015/प्र.क्र.189/नवि 14 दिनांक 23/06/2015 नुसार मा. शासनाने निर्णय घेतला आहे.

मा. शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार एकूण 70 सेवा स्थानिक प्राधिकरणांनी अध्यादेशाचे कलम 3 (अ) नुसार अधिसूचित करावयाच्या आहेत. परंतु त्यापैकी 05 सेवा या फक्त महानगरपालिकेकरिता लागू असल्याने अलिवाग नगरपरिषदेकडून नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवांची संख्या 65 इतकी होते. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश 2015 कलम 3 अन्वये सदर 65 लोकसेवांची सूची, आवश्यक कागदपत्र फी, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलिय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी यांची माहिती महाराष्ट्र शासन राजपत्रात भाग दोन संकीर्ण सूचना व जाहिराती अंतर्गत प्रसिध्द करण्यात आले आहे तसेच सदर माहिती अलिबाग नगरपरिषदेच्या येबसाईटवर देखील उपलब्ध आहे.

सही/-<br>
प्रशासक तथा मुख्याधिकारी,<br>
अलिबाग नगरपरिषद.